# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**तात्काळ/महत्वाचे** जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/२९५०

दिनांक :- १९ सप्टेंबर २०१९

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/

विनाअनुदानित /विद्यापीठ विभाग / विद्यापीठ संचलित/

पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

विषय : - शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी पडताळणी करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

संदर्भ : - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/प्र या पडताळणी /२०१९/७१५ दि. ०९/०९/२०१९.

उपरोक्त संदर्भिय विषयी कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी व त्यास मान्यता देण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५, दिनांक १७/०८/२०१५ च्या कलम ९ पोटकलम ५ मध्ये प्रवेशित याद्या पडताळणीबाबतची खालील प्रमाणे तरतूद आहे.

1. Every unaided Institution shall submit the 'admission approval proposals' to the concerned Directorate **within 15 days** from the cutoff date of the admission;
2. Every Institution shall submit such proposal certified by the concerned Directorate to Admissions Regulating Authority within 2 months from the date of such a certification;
3. Every such proposal received from the Institution by Admissions Regulating Authority shall be scrutinized and approved before the 31st January of every year;

अधिनियमातील वरील तरतूदींच्या अनुषंगाने संस्था/महाविद्यालय व त्यातील अभ्यासक्रम विचारात घेता जलद व अचुकपणे छाननी व मान्यतेची प्रक्रिया होण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्यांचे प्रस्ताव ऑन लाईन पध्दतीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पडताळणी करणे व त्यास मान्यता देण्याचे निश्चित केलेले आहे.

अधिनियम २०१५ मधील तरतुदींच्या आधारे संस्थानिहाय तपासणी अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे. करीता या कार्यालयाच्या सर्व अधिनस्त असलेल्या व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमधील प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रवेश नियमावलीनुसार पडताळणी करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने वरील बाबी आणि प्रकरणाची कालमर्यादा विचारात घेऊन या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी गुणवत्ता याद्या पडताळणीच्या अनुषंगाने तात्काळ www.safalta.org या संकेतस्थळावर प्रवेशित विद्यार्थ्यांचे कागदपत्र अपलोड करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सोबतः- वरील प्रमाणे

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर

२ या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.